## कार्यालय, शिक्षण विभाग प्राथमिक,
## जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

E-mail Id - mdmabad@gmail.com
Website : https://aurangabadzp.gov.in/
दुरध्वणी क्रमांक - 0240-2329714

जा. क्र.जिपछसं/शिक्षण/प्रावि-3/2025/1131 /1230 दिनांक :- 10 .02.2025

प्रति,

**अध्यक्ष /सचिव/मुख्याध्यापक,**
सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, छत्रपती संभाजीनगर संचलित संचलित
माऊंट व्हॅली टेक्नो स्कूल, बाळापूर परिसर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर.

**विषय :-** **वैयक्तिक / सेवासातत्य मान्यता देणे बाबत. (श्रीमती मोराळे किर्ती दिनकराव )**

**संदर्भ:-**
1.महाराष्ट्र खाजगी शाळाकर्मचारी ( सेवाशर्ती) नियम 1981
2.शासन निर्णय क्र पीआरई-2011/प्रक्र 177/ प्राशि-1 दि. 19 मार्च, 2012
3.शासन निर्णय क्र आरटीई-2010/प्रक्र 2010/प्रक्र 572/प्राशि-1 दि. 13 फेब्रुवारी, 2013
4.शासन निर्णय क्र एसएसएन-2015/प्रक्र 20/15 टीएनटी-2 दि.13 जुलै, 2016
5.शासन निर्णय क्र सीईटी-2015/ प्र.क्र. 149/ टीएनटी- 1 दिनांक 20 जून, 2018
6.शासन निर्णय क्र एसएसएन-2016/प्रक्र 30/टिएनटी-1 दिनांक 24.08.2018
7. आपला प्रस्ताव 2024/25 दि.07.02.2025

वरील विषयी संदर्भ क्र. 7 अन्वये, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, छत्रपती संभाजीनगर संचलित माऊंट व्हॅली टेक्नो स्कूल, बाळापूर परिसर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर या शाळेमध्ये संस्थेने नियुक्ती केलेले श्रीमती मोराळे किर्ती दिनकराव यांचा शिक्षणसेवक/ सहशिक्षक म्हणुन वैयवितक/सेवासातत्य मान्यतेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

संदर्भ क्रमांक 3 वरील शासन निर्णय अन्वये दिनांक 13.02.2013 नंतर सहशिक्षक/ शिक्षणसेवकांना, शिक्षक पात्रता परिक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे. (अल्पसंख्यांक व्यवस्थापनाच्या शाळासह) खालील सहशिक्षक यांची नियुक्ती ही दिनांक 13.02.2013 नंतरची आहे. संस्था / मुख्याध्यापक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानूसार संदर्भ क्र 02 ते 06 वरील शासन निर्णयान्वये शिक्षणसेवक म्हणुन पूर्णत: अनुदानित तत्वावरील रिक्त पदावर नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | जात | जन्म दिनांक | प्रथम नेमणुक दिनांक | शैक्षणिक पात्रता | हुद्दा/पद | वेतन श्रेणी | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मोराळे किर्ती दिनकराव | भ.ज.ड./वंजारी | 09.08.1989 | 20.06.2018 | H.S.C.Ded. | सहशिक्षक | एस-10 29200-92300 | श्रीमती मोराळे किर्ती दिनकराव या शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पात्र असल्याने त्यांची दि. 20.06.2018 पासून एकत्रीत मानधन रु. 6000/- तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी शिक्षणसेवक म्हणुन व दि. 20.06.2021 पासून सहशिक्षक म्हणुन एस-10 29200-92300 या वेतनश्रेणीत पूर्णत: अनुदानित (100%) पदावर नियमीत सेवासातत्यास मान्यता देण्यात येत आहे. |

उपरोक्त मान्यता महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियम 1981 व कलम (1) मधील तरतुदी नूसार संच मान्यतेच्या अधीन राहून देण्यात आलेली आहे. तसेच मान्यता दिलेले शिक्षक धरुन आपल्या शाळेतील शिक्षकांची संख्या या कार्यालयास निश्चित केलेल्या शिक्षक संख्येपेक्षा जास्त होता कामा नये. वरील मान्यता दिल्यामुळे आपल्या शाळेतील

कृ.मा.प.

उपरोक्त पात्रतेची कायम शिक्षक अतिरिक्त झालेले आढळुन आल्यास मान्यता रद्द केली जाईल. संबधिताच्या संस्थेने, मुख्याध्यापकाने दिलेल्या कागदी पुराव्याच्या अधारे मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी भविष्यात तफावत अथवा दिलेले कागद पत्रे खोटी तसेच शासन नियमाच्या विरुध्द आढळुन आल्यास व तक्रारी उद्‌भवल्यास व त्यामध्ये तथ्य निदर्शनास आल्यास सदर मान्यता रद्द करुन संस्था/ मुख्याध्यापक यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.



**(जयश्री चव्हाण)**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

**प्रतिलीपी**:-

1. अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक (प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर.
2. संबंधितास, मुख्याध्यापक मार्फत.